# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक ७ ]

**दिनांक : १४ /९/२०१६** **वेळ : दुपारी १२.०० वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे सप्टेंबर २०१६ ची मासिक सभा बुधवार दिनांक १४/९/२०१६ रोजी दु. १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

1. मा. पांढरकर निलेश शंकरराव – सभापती
2. मा. सुभद्रा ईश्वर ठोंबरे
3. मा. भारती फरांदे
4. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
5. मा. नेटके सुमन राजेंद्र
6. मा. तरस बाळासाहेब जयवंत
7. मा. भोंडवे संगिता राजेंद्र
8. मा. प्रसाद शेट्टी
9. मा. टेकवडे सुजाता अविनाश
10. मा. काळभोर वैशाली जालिंदर
11. मा. सतिश झांबरे [ स्वीकृत सदस्या ]
12. मा. गिरीष गोपाळ कुटे [ स्वीकृत सदस्य ]

तसेच श्रीम. आशादेवी दुरगुडे - क्षेत्रीय अधिकारी, श्री. फारुक शेख - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री मिलींद कपिले – कार्यकारी अभियंता, विदयुत , श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री प्रदीप पुजारी – प्रभारी कार्यकारी अभियंता झोनिपु, श्री पी जे कदम – लेखाधिकारी, श्री.सुनिल वाघुंडे, श्री. अनिल शिंदे , श्री बन्सल एच पी., श्री शिंदे एच .एस. , श्रीम बाबर एल.एस., श्रीम मोमीन झेड.आय., श्री वैभव पुसाळकर - उपअभियंता, श्री. शेख एस के, श्री लवटे, - कनिष्ठ अभियंता, श्रीम डीडी गुमास्ते – कार्यालय अधिक्षक तथा अतिक्रमण प्रमुख, श्री. सासवडकर डी एस., श्री देसाई एस बी, – मुख्य आरोग्य् निरिक्षक, श्री झिंगाडे - आरोग्य् निरिक्षक , श्री कुंभार पी एस – हॉ. सुपरवायजर , श्री हरिश्चंद्रे ए.आर. – उदयान , उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. पांढरकर निलेश यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

सर्व प्रथम मागील सभेचा सभावृत्तांत [ दिनांक १०/८/२०१६ कार्यपत्रिका क्रमांक ६ ] वाचून कायम करणेत आला त्यानंतर सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्रमांक ४ : मा. प्रसाद शेट्टी, मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन [ आनंदनगर ] येथील एम्पायर इस्टेट सोसायटी जवळील उड्डानपुलास **सेंट मदर टेरेसा उड्डानपुल** नामकरण करणेस मान्यता देणे.

वरील प्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक :४९ विषय क्रमांक : १

दिनांक : १४/९/२०१६ विभाग :

सुचक : मा. आर एस कुमार अनुमोदक : मा. भालेराव प्रतिभा

संदर्भ : मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो. समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास **"हस्तीमल शेठ गादिया मार्ग"** असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ५० विषय क्रमांक : २

दिनांक : १४/९/२०१६ विभाग :

सुचक : मा. सुजाता टेकवडे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. ९/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

शुभारंभ कॉलनी, स.नं. (१३१/२ व १३०/१ मधील) यास **शुभारंभ कॉलनी** असा

नामफलक बसवून मिळणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-------

ठराव क्रमांक : ५१ विषय क्रमांक : ३

दिनांक : १४/९/२०१६ विभाग :

सुचक : मा. भारती फरांदे अनुमोदक : मा. सुमन नेटके

संदर्भ : मा. संगिताताई भोंडवे, नगरसदस्या यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

रावेत बीआरटीएस रोडवरती श्री. बबन शं. शेटे यांच्या घरा समोरील नगरसेविका सौ. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांच्या नामफलकाशेजारील चौकास **" कै. ज्ञानदेव केसू भोंडवे चौक "** असे नाव देण्यात यावे. तसेच सोनटक्के वस्ती सर्व्हे १२/५ रावेत या ठिकाणी **" यशवंत नगर , सोनटक्के वस्ती "** असे नामकरण करणेत यावे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेची वेळी करणेत यावा.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ५२ विषय क्रमांक :४

दिनांक : १४/९/२०१६ विभाग :

सूचक : मा. प्रसाद शेट्टी अनुमोदक : मा. वैशाली काळभोर

संदर्भ :- मा. प्रसाद शेट्टी , नगरसदस्य यांचा दिनांक १४/९/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन [ आनंदनगर ] येथील एम्पायर इस्टेट सोसायटी जवळील उड्डानपुलास **सेंट मदर टेरेसा उड्डानपुल** असे नामकरण करणेस तसेच सदरचे काम बी.आर.टी.एस. विभागाकडील चालू असलेल्या स्थापत्य विषयक कामातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

**त्यानंतर प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा यांनी मा. डॉ. यशवंतराव माने, सहाय्यक आयुक्त, निवडणूक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, निवडणूक विभाग यांचेकडील पत्र क्रमांक निवडणूक/१/कावि/४८०/२०१६ दि २/९/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ चे अनुषंगाने मतदार नोंदणी व जनजागृतीबाबत प्राप्त झालेल्या पत्राचे संपूर्ण वाचन सभागृहात करुन दाखविले. सदर पत्राचे अनुषंगाने उपस्थित सन्मा. नगरसदस्य / नगरसदस्या यांनी आप-आपले वॉर्डामधील नागरिकांना या मोहिमेची माहिती देवून पात्र मतदारांनी मतदार यादीमध्ये नावे समाविष्ट करणेकामी प्रवृत्त करण्याचे आवाहन करावे अशी विनंती केली.**

वरील प्रमाणे अ प्रभाग समितीच्या मासिक सभेचे कामकाज होऊन मा.सभापती निलेश पांढारकर यांनी प्रस्तुत ची सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
**( निलेश शंकरराव पांढरकर)**
**सभापती**
**अ प्रभाग समिती**

क्र. अक्षेका /११/कावि/ ३७४ /२०१६
दिनांक : ४ /१०/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती
निगडी - ४४

प्रति, सर्व संबंधित विभाग